840

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८४०

# अभंगमाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. काव्य नं. ८४०
ता. २२-२-
ठाणे.

लेखक.

दु. आ. तिवारी.

REFBK-0002869
REFBK-0002869

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

# अभंगमाला.

लेखक
दु. आ. तिवारी–जळगांव.

प्रकाशक
गबाजी सुपडू शिंपी,
काव्यानंद मंडळ–चाळिसगांव.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्याकडे )

REFBK-0002869

पुण येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें.

आगष्ट १९२५

किंमत ४ आणे.

नवीन सभासद

गेंदालाल महाराज सिंह रघुवंशी........१० रुपये

काव्य नं. ७७७
ता. ...
ठाणे.

# " प्रकाशकाचें निवेदन "

काव्याच्या वाचन--लेखनादि व्यासंगांत ज्यांस आनंद वाटतो अशा काव्यानंदी मित्रांचें हें ' काव्यानंद- मंडल ' होय. रसिकांना आनंददायक कवितांचें प्रकाशन करणें हा मंडलाचा मुख्य उद्देश आहे. देवी सरस्वतीची इतरत्र षोडशोपचारें पूजा व आराधना होत असली तरी आपणाला करितां येईल तें करून तिजविषयींचें आपलें कर्तव्य आचरावें हा मंडळाचा अंतर्हेतु आहे.

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कवि श्री. दु. आ. तिवारी यांनीं आपली ' अभंग-माला ' मंडळाच्या प्रसिद्धीला दिली. आमच्या मंडळाच्या अभंगत्वाला हा शुभ शकुन आहे असें आह्मी समजतों.

| सभासदांचीं नांवें. | वर्गणी– |
|---|---|
| १ चिंतामण लक्ष्मण मुळे सब असि० सर्जन–शेगांव... | १०–०–० |
| २ शंकर गोविंद कुळकर्णी—सावदे ... ... ... | १०–०–० |
| ३ मि. का. भोरटक्के—सावदे ... ... ... | १०–०–० |
| ४ विष्णु भिकु कोलते (नरवेलकर) मॉरिस कॉलेज—नागपूर | १०–०–० |
| ५ श्री. गुलाब ... ... भादली... ... ... | १०–०–० |
| ६ सदाशिव नरहर भावे... नाशिराबाद ... ... | १०–०–० |
| ७ सीता–कुमार ... ... चाळिसगांव ... ... | १०–०–० |
| ८ जगन्नाथ राघव फरकाडे शेंदुरजना ... ... | १०–०–० |

सेक्रेटरी— सीताकुमार.
काव्यानंद मंडल, चाळिसगांव.
पू. खा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य नं. ७७७
ना. ......
ठाणे.

# प्रस्तावना.

संस्कृत भाषेंतील छंदशास्त्रांत ज्यांचें नियमन केलें गेलें आहे व ज्यांचा संस्कृत कवींनीं आपल्या काव्यांत उपयोग केला आहे तीं संस्कृतवृत्तें होत; आणि मुकुंदराय, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम वगैरे संतकवींनीं ज्यांतून आपलीं काव्यें लिहिलीं तीं ओवी अभंगादि मराठी वृत्तें होत. अर्थात् या मराठी वृत्तांचा जन्म वरील संतकवींच्या कंठांत झाला असें म्हणतां येईल. मराठींत काव्याचा प्रथम जन्म मुकुंदरायापासून झाला. त्या वेळच्या मराठी भाषेच्या तोकड्या स्वरूपांत संतकवींचे पारमार्थिक विचार, वेदांतिक व धार्मिक विचार व्यक्त व्हावयास गणवृत्तें उपयुक्त झालीं नसावींत. शिवाय संस्कृतांतील कांहीं ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करतांना त्या भाषेंतील सामासिक शब्दांत बव्हंशानें भरून राहिलेला अर्थ मराठींत आणावयास ओवी, अभंग हीं वृत्तेंच उपयुक्त वाटलीं असावीं असें तर्कशुद्ध अनुमान निघतें.

ओवी आणि अभंग हीं दोनच मराठी वृत्तें घेतलीं तर या दोन वृत्तांत किती तरी जुन्या मराठी कवींचें काव्यवाङ्मय निर्माण झालें आहे! ज्ञानेश्वरी, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, रुक्मिणीस्वयंवर वगैरे बहुतेक मराठी धार्मिक ग्रंथ ओवी वृत्तांतच आहेत. अजूनही आधुनिक दासगणु कवींचा ‘ साईप्रभा ’ मासिकांतून प्रसिद्ध होणारा साईविजय ग्रंथ ओवी वृत्तांतच लिहिला जात आहे. पण प्रासादिक ओवी ज्ञानेश्वराचीच प्रसिद्ध आहे. अभंग हें वृत्त ग्रंथरचनेच्या उपयोगीं आणलेलें फारसें दिसत नाहीं. संसाराविषयीं अगदीं उदासीन अशा तुकाराम, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई वगैरे भगवद्भक्तांनीं आपले पारमार्थिक विचार, ईश्वरीभक्ती, तद्रूपभावना या अभंगांतूनच व्यक्त केल्या आहेत. अर्थात् या भागवत कवींच्या भक्तिकुंजांत वेळोवेळीं उमललेलीं हीं अभंगांचीं फुलें अजूनही अभंग परिमल देत आहेत!

त्यांतही तुकारामाच्या अभंगकुंजांतील परिमल अत्यंत उत्कट म्हणून प्रसिद्ध आहे.

ओवी अभंगाची परंपरा रामदास, मोरोपंतांपर्यंत आढळते. पुढें ती बुझाल्यासारखी वाटते. आधुनिक कवींत कै० रे० टिळक आणि कै० गोविंदाग्रज यांनीं कांहीं अभंग लिहिले. त्यांत दोघांचीही ईश्वरी भक्ति भरली आहे. यावरून अभंग हें भक्तिमय स्फुट काव्यरत्नाचें कोंदणच आहे असें ह्मणावें लागतें. कारण आधुनिक कालांतील संतपरंपरेपर्यंत केवळ स्थूलमानानें पाहिलें तरी असें आढळून येतें कीं, ज्यास थोडें तरी काव्याचें अंग आहे अशा बहुतेक संतांच्या भक्तिमय अंत:करणांत फुललेलीं काव्याचीं सुमनें अभंग वृत्तसूत्रांतूनच गुंफलीं गेलीं आहेत.

सहजोद्गार हें अभंगाचें मुख्य लक्षण आहे. या पुस्तकांतील अभंगांचा प्रारंभ सहजोद्गारांनींच झाला. काव्यरत्नावलीचे संपादक श्री०नारायण नरसिंह फडणीस यांस ते प्रारंभींचे अभंग फार आवडले. हे अभंग जसजसे काव्यरत्नावली, प्रफुल्लता यांतून प्रसिद्ध होत गेले तसतशी काव्यरसिकांची त्यांजविषयींची प्रसन्नता दिसून आली. पुढें मराठी शिक्षक व धर्मजागृति या मासिकांतूनही कांहीं अभंगांची प्रसिद्धी झाली. आज रसिकांपुढें पुस्तकरूपानें येणाऱ्या या अभंगमालेंत वाचकांस ३ भाग आढळून येतील. पहिला भाग ( १ ते ५६ ) परमेश्वरविषयक प्रसन्न भक्तीचा आहे दुसरा ( ५७ ते १०९ ) सामान्य व्यवहारविषयक आहे. व तिसरा अगदीं निराळा आहे.

अभंगांचे निरनिराळे प्रकार आहेत. पण त्यांपैकीं,

**आपुलेया बळें, नाहीं बोलवत। सखा भगवंत, कृपा त्याची ॥**

हा एकच प्रकार मीं उपयोगांत आणिला आहे. अशा अभंगाच्या एका ओळींत चार चरणें काल्पिलीं तर मधल्या दोन चरणांत यमक असतें, पण एका अभंगाच्या चारी ओळींच्या शेवटीं यमक क्वचितच असतें. या अभंगमालेंत ३।४ अपवाद सोडून मधलीं व शेवटचींही यमकें साधलीं आहेत.

ज्या संतकवींकडून आजवर अभंग लिहिले गेले त्यांच्या साध्या सरळ व्यावहारिक भाषेचेंच वळण अभंगास लागलें आहे. त्यांत संस्कृत शब्दांचा भरणा, त्यांचे समास हें कांहीं नसून उलट जुने मराठी शब्द, लहान लहान वाक्यें असेंच अभंगाचें भाषास्वरूप सर्वांच्या परिचयाचें आहे. पूर्वींची मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा यांचीं स्वरूपें बदललीं असल्यामुळें मीं साध्या सरळ भाषेंतच हे अभंग लिहिले असले तरी आजच्या मराठीचें स्वरूप त्यांत व्यक्त होणें साहजिक आहे.

भगवद्भक्त तुकारामाच्या अभंगाची श्रवणमनोहर वीणा कुठें, आणि अभंगमालेच्या लेंखकाची ही लहानशी बासरी कुठें ! बासरींतील कांहीं सूर काव्यरसज्ञास आवडले तर त्याचेंही श्रेय त्या बनसीधर गोपाळ कृष्णाकडेच आहे.

**"मी तों आहें तुझ्या मुखाची बासरी। कंठाची माधुरी नाहीं माझी॥"**

**अभंग ९**

जळगांव. २१।७।२५ — **द. आ. तिवारी**

मराठी ग्रंथ संग्रहालय,
कायम नं. ८८८
ता.
ठाणे.

# समर्पण.



तुझें एक ध्यान हरपलें भान । नादांत रंगून हार केला ॥
परिमलहीन सौंदर्यविहीन । माझी ही अर्पण पुष्पमाला ॥
तूंच शबरीच्या सेविलें बोराला । प्रेमाचा उमाळा ओळखिला ॥
नको दोष पाहूं दास मी पायाचा । असूं दे खुणेचा माझा झेला ॥ १ ॥

विनीत

दु. आ. तिवारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. २८०८
२९-८-१९५
ठाणे
रि. कोळ नं. ५८५
ता. २९-८-१९५
ठाणे
२६८

# अभंगमाळा.

—:००:—

यमुनेच्या तीरीं कर्णमनोहारी । वाजवी बांसरी गिरिधारी ॥
गोप गोपिकांचा सभोंवतीं मेळा । तन्मय जहाला गानांतरीं ॥
मिटल्या नेत्रानें दृश्य तें पहावें । रूप आठवावें दीनोद्धारी ॥
परी ताटातूटी करीते ही माया । अडकलों राया ! या संसारीं ॥१॥

तुझें नवनाम नव दिनीं द्यावें । कर्तव्यीं रमावें उत्साहानें ॥
तुझाची आधार तुझाची आश्रय । विपत्तीचें भय चित्त नेणें ॥
कर्तव्यश्रमाचा उच्छ्वास शेवटीं । सोडूं जगजेठी त्वन्नामानें ॥
शंखचक्रधारी वैकुंठविहारी । होई साह्यकारी वात्सल्यानें ॥ २ ॥

तुझें नांव घ्यावें संसारीं रहावें । दुःख हाल जावें विसरोनी ॥
तुझें नांव घ्यावें कर्म आचरावें । फलाफल जावें विसरोनी ॥
तुझें नांव घ्यावें भक्तिगीत गावें । तालसूर जावें विसरोनी ॥
नामाच्या नौकेंत झोकोनियां देह । जावें निःसंदेह उद्धरोनी ॥३॥

नाम घेतां मूर्ती भरते या नेत्रीं । पूजेची मी पूर्ती करूं कैशी ? ॥
गंध फल पुष्पें आरती नैवेद्य । दिलीं मनोवंद्य हीं सेवेसी ॥
यावें भक्तिनाथा! माझ्या आवडीच्या । बैसा हृदयाच्या आसनाशीं॥
जातां जातां माझें बोट हातीं धरा । घेवोनीया चला या बाळाशीं ॥४॥

ज्याच्या करीं होती सुंदर बांसरी । मोरपिसें शिरीं; पाहिला का ?
देहीं घनश्याम नयनाभिराम । गोपालललाम पाहिला का ?

कुंजवनचारी यमुनाविहारी । कृष्ण मनोहारी पाहिला का ?
ऐशी जी पृच्छिका धन्य ती राधिका । आम्हांचाच सुका भाव फिका ५

धनुर्धारी भीष्म वर्षताहे बाण । विद्धांग अर्जुन जैं जाहला ॥
भक्त-कारुण्यानें प्रतिज्ञा मोडून । द्वारकेचा नाथ खड्ग त्याला ! ॥

रथाखालीं आला तोंच चरणाला । पाही अर्जुनाला लोळलेला ! ॥
वैकुंठाचा नाथ अडविला भक्तें । दृश्य रमवीतें मानसाला! ॥ ६ ॥

रामचंद्रराया ! भरताच्या शीर्षीं । हस्त वनवासीं तूं ठेविला ॥
सांग तोच हस्त सीतापती देवा । ठेवशील केव्हां मच्छीर्षाला ! ॥

लक्ष्मण बंधु पडे भूमीवरी । तुंवा अंकावरी निजविला ॥
रघुकुलनाथा ! त्याच अंकावरी । घेशी केव्हां तरी सांग मला ? ॥ ७ ॥

काय माकडांनीं राक्षस जिंकावे । पाषाण तरावे जलधींत ! ॥
काय वानरांनीं उल्लंघावा अब्धि । बोधावा दुर्बुद्धि लंकानाथ ! ॥
प्रत्येकाच्या शीर्षीं रघुकुलदीपा । तुझी होती कृपा अखंडित ॥
कृपाळा ! कृपांशें दास करीं धन्य । जाईन तरून संसारांत ॥ ८ ॥

मी तों आहें तुझ्या मुखाची बांसरी । कंठाची माधुरी नाहीं माझी ॥
मी तों नट आहें नाट्यसृष्टीवरी । करीतों चाकरी राया ! तुझी ॥
मी तों चित्र आहें सृष्टिपटावरी । तुझ्या हातीं दोरी मद्देहाची ॥
वरतीं चढीव खालतीं वा ओढ । अंतीं देई जोड त्वत्पादांची ॥ ९ ॥

तुवां दिलें ज्ञान झालों ज्ञानवान । त्याचा अभिमान मज नसो ॥
तुवां दिली बुद्धि झालों बुद्धिमान । गर्व तिळही न मज असो ॥
कल्पना विचार तुझेंचि भांडार । प्रतिष्ठेचा भार मज नसो ॥
माझें जें जें कांहीं सुंदर असेल । त्याचें सर्व मोल तुज असो ॥ १० ॥

नको गाजावाजा देवा मन्नामाचा। तुझ्याची कीर्तीचा डंका वाजो ॥
लोक-येरझारा नको मद्गेहास। तुझ्या देवळास फेऱ्या साजो ॥
नको मज मान तवपदलीन। जगत संपूर्ण तुज भजो ॥
मज भय वाटे तुटो नाच कदा। जाहला एकदां संबंध जो ॥ ११ ॥

तुझ्या मंदिराचा पाषाण मी व्हावा। पायीं तुडवावा संताचिया ॥
तुझ्या मंदिराचा छायावृक्ष व्हावा। घडो साधुसेवा देहीं माझ्या ॥
तुझ्या मंदिराचा व्हावा मी निर्झर ! मळो ही निर्भर माझी काया ॥
पुरवावी आस आशेच्या दयाळा। तुजवीण गेला क्षण वाया ॥१२॥

विटेवरी जागा तिळही असेल। होईन मी तीळ पायांसाठीं ॥
विटेवरी जागा असो एक रेणू। होईन मी रेणू तुझ्यासाठीं ॥
विटेवरी जागा अणुमात्र असो। अणुरूप वसों जगजेठी ॥
माझा स्वर्ग लोक तुझ्यापदधामीं। अंतरींच्या उर्मी येती ओष्ठीं ॥१३॥

पितांबरधारी-कोठें जाशी राया। धरिलें या पाया ना सोडीन ॥
नको झिडकारूं आधीं सांग मातें। विनवूं कोणातें तुजवीण ॥
दाटला हा कंठ रडेन मोठ्यानें। तुज वात्सल्यानें मोहवीन ॥
वैकुंठाच्या नाथा ! वैकुंठ पाहूं दे। दाराशीं राहूं दे दुःखी दीन ॥१४॥

दिसलें त्वद्द्वार हेंची माझें भाग्य। काय मागूं सांग द्वारापाशीं ॥
पाहिली त्वन्मूर्ती झालें मत्साफल्य। आतां मागूं काय तुझ्यापाशीं ॥
जग माझें नाहीं जगाचा मी नाहीं। निरिच्छेनें पाहीं या सृष्टीशीं ॥
ठेव हात माझ्या मस्तकीं दयाळा। राहूं दे या बाळा चरणाशीं ॥ १५ ॥

आज तुझी भक्ति उद्यां भवासक्ति। अस्थिर ही वृत्ती आधीं जाळी ॥
सागरिंचा धोंडा तळीं ठाव घेई। तैशी वृत्ति व्हावी सर्वकाळीं ॥

तत्वाचें विज्ञान ब्रह्माचें पुराण । अडती चरण यांच्या जाळीं ॥
भक्तिमार्ग माझा तुझ्या मंदिराचा । सरळपणाचा वनमाळी ॥१६॥

देवा ! तुझी इच्छा राजा मी असावें । रंक कीं असावें संतोषी मी ॥
प्रभो ! तुझा हेतु उदासी असावें । आनंदी असावें आनंदीं मी ॥
विभो ! तुझा भाव विरागी असावें । विलासी असावें विलासी मी ॥
तुझ्या लीलेवरी माझें दैव नाचो । दास मात्र असो पायाचा मी ॥१७॥

काय कुणीं द्यावें काय कुणी घ्यावें ! व्यर्थ मिरवावा गर्व चित्तीं ॥
सारेच भिकारी भेदाभेद त्यांत । याचक श्रीमंत सोंगें घेती ॥
आज दातृवृत्ति उद्यां भिक्षावृत्ति । ऐशा लोक स्थिती येती जाती ॥
एक मात्र दाता लक्ष्मीनारायण । रिझवावें मन त्याच्या भक्तीं ॥१८॥

सौंदर्यानें जेव्हां नेत्र मोहताती । नेत्रांना मी स्मृती तुझी देतों ॥
ऐश्वर्यानें जेव्हां उपजे आश्चर्य । तुझें दानशौर्य आठवतों ॥
औदार्यानें जेव्हां आनंदतों साच । बुद्धिदाता तूंच तुला गातों ॥
आनंदाश्चर्यांत आणि प्रमोहांत । मिटल्या नेत्रांत तुला ध्यातों ॥१९॥

तुझ्या संकल्पांत विकल्प सोडीला । निंदूं दे लोकांला लोकनाथा ॥
तुझ्या हेतुमाजी निर्हेतुक झालों । कुणी कांहीं बोलो भगवंता ॥
तुझ्या यदृच्छेंत निरिच्छ मी दास । आप्त देवो दोष लक्ष्मीवंता ॥
तुझी माया मातें समाधान देते । हसूं दे जगातें जगन्नाथा ॥ २० ॥

तुझ्या उपकारीं बद्ध मज करीं । नको दारोदारीं पाठवूं वा ! ॥
तुझ्या स्नेहीं लाव माझ्या या मनाला । मनधरणीला त्रासलों वा॥
तुझ्याची आधीन मज घे करून । किति पराधीन राहावें वा ! ॥
माझे डोळे आले अश्रूंनीं भरून । पाठीशीं येऊन ठाक उभा ? ॥२१॥

रागावलों भारी कृपावंतावरी । हंसला कैवारी पाठीमागें ! ॥
निर्दय म्हणालों दयासागराला । माझ्या कल्याणाला तोच जागे !॥
त्याच्या चित्तीं मज द्यावा 'रत्नहार' । मीच खोटीं गार मागूं लागे !॥
अनुभव आला अंतरांत माझ्या । वागेन मी तुझ्या इच्छामार्गें ॥२२॥

कुणी जप करी कुणी तप करी । कांहीं मीं श्रीहरी केलें नाहीं ! ॥
कुणी ध्यान धरी धर्म कर्म करी । कांहीं मीं श्रीहरी केलें नाहीं ! ॥
कथा वा कीर्तन पुराणश्रवण । कांहींच जन्मून केलें नाहीं ! ॥
आतां दोन्ही हात मस्तकीं जोडून । वंदितों चरण देवा पाहीं !॥२३॥

तारिलें ध्रुवाला तेवीं प्रल्हादाला । अजामिळ त्याला तारिलें तूं ! ॥
द्रौपदी झांकिली तारा आश्वासीली । अहिल्याही भली उद्धरी तूं ! ॥
गजेंद्रकैवारी कालियाविहारी । गोवर्धनधारी शोभला तूं ! ॥
भक्तवात्सल्याच्या रमतों यशांत । तद्रूप मनांत कैचा किंतू !॥२५॥

तुझें तरी व्रत पतितोद्धाराचें । नाहीं ढळायाचें कदाकाळीं ! ॥
मी तरी पापांत नित्य लोळतसें । पतितची असे सर्व काळीं ! ॥
तुझ्या ममतेचा अंतरांत ठसा । मळवीं शिशूसा देह धूळीं ! ॥
मुखें बोलतांही मज लाज नाहीं । तूंच बापभाई मळ क्षाळी ? ॥२६॥

वेळोवेळीं देवा ! चुकलों असेन । कठिण हें मन कोठवरी ? ॥
बोध विसरून वागलों असेन । परी आतां मौन कोठवरी ? ॥
पसारिले हात दृष्टि गगनांत । नेत्र भरतात बाष्पपूरीं ? ॥
झुकल्या नावेला धरी सांवरून । करी उद्धरण हरी हरी ! ॥ २७ ॥

समुद्रास लाटा आल्या गेल्या किती । तयानें गणती केली नाहीं ॥
किती वेळा भूमी हाले भूकंपानें । गणती तियेनें केली नाहीं ॥

ग्रहणाची पीडा रविचंद्र यांना । तयांनीं गणना केली नाहीं ॥
संसाराचीं दुःखें येवोनिया गेलीं । पुढच्या पावलीं मार्ग पाही ॥२८॥

त्र्यंबकेश्वरांत मान शंकराला । तेथें श्रीदत्ताला कोण पूजी ? ॥
गाणगापुरांत मान श्रीदत्ताला । तेथें श्रीकृष्णाला कोण पूजी ?
द्वारकेंत मान यदुभूषणाला । तेथें विठ्ठलाला कोण पूजी ? ॥
एक नारायण नटला हो मात्र । स्थान महात्म्यांत जगामाजी ॥२९॥

दूर क्षेत्रवासी ऐकिलें कीर्तीशीं । पाहूं त्वन्मूर्तीशीं इच्छा ऐशी ॥
मार्गी तव ध्यान करीतां त्वद्गान । श्रम भासती न शरीराशीं ॥
उत्कंठायोगांत प्रीतीच्या साह्यानें । भक्त ये भक्तीनें द्वारापाशीं ॥
निष्कांचन योगें बडव्यांनीं कांहीं । येऊं दिलें नाहीं पायापाशीं ॥३०॥

एकादशी दिनीं तुझ्या भेटीसाठीं । झाली लोक दाटी पांडुरंगा ! ॥
शक्तिमंत गेले तुडवुनी पायीं । दीन 'आई आई' रडले गा ? ॥
त्यांचे अश्रु कोणी पुसायास नाहीं । कोण त्यांच्या पाही देहभंगा ।?।
उद्यां आनंदानें वंदीन चरण । रक्षूं आज दीन हे श्रीरंगा ! ॥ ३१ ॥

कमलाभोंवतीं दाटतें शैवाळ । सारोनी मराळ पद्म सेवी ।
डाळिंबाभोंवतीं त्वचा सत्वहीन । शुक विदारून बीज सेवी ॥
उद्यानाभोंवतीं काटेरी कुंपण । भृंग ते लंघून पुष्प सेवी ॥
विठ्ठलाभोंवतीं बडव्यांचा मेळा । सारोनी प्रभूला भक्त सेवी ॥३२॥

उद्यां भूकंपांत तनु चिरडेल । मनीं आठवूं दे मूर्ति आजी ॥
उद्यां गांठ असो विक्राळ काळाशीं । शिर लववूं दे पायीं आजी ॥
उद्यां प्रळयांत देह हा बुडेल । करोनी घेऊं दे भक्ती आजी ॥
उद्यां होणारें जें होवो तें श्रीरंगा । चरणीं अभंगा बुद्धि माझी ॥३३॥

माझ्या निर्धारास तुझाची आधार । भक्ताचा कैवार तुवां घ्यावा!॥
हाकारिली नाव तुझ्या नांवावरी । शीड आणि दोरी नाहीं देवा ॥
माझी तों प्रतिज्ञा होवोनियां गेली । आतां वनमाळी धीर द्यावा! ॥
निश्चयी मत्कंठ निर्वाणीचें गान। करीतो स्मरून भक्तिभावा ॥३४॥

साखरेशीं माशी सोडिते न जैशी । मति माझी तैशी तुझ्याठायीं ॥
पद्माशीं भ्रमर सोडितो न जैसा । माझा भाव तैसा तुझ्यापायीं ॥
तुझ्याच रसाची लागली चटक। कोणाचाहि धाक नाहीं नाहीं ॥
असो मी पामर असो मी किंकर। ठाकोनी समोर तुज बाही ॥ ३५ ॥

दयासागराच्या दर्शनाची हौस । दयानिदिध्यास तो असावा ॥
शांतिसागराच्या संगतीची आस। शांतीचा अभ्यास आचरावा ॥
जगत्कल्याणाचा त्याचा परिपाठ । आपण तो पाठ गिरवावा ॥
तुल्य गुणयोग असल्यावांचून। दावी कोणीही न स्नेहभावा ॥३६॥

चंद्रावीण जैशी रजनी शोभेना । धरित्री शोभेना मेघाविना ॥
कुंकुमविहिना सुंदरी शोभेना । वाटिका शोभेना पुष्पहीना ॥
सुंदरीची वेणी निष्पुष्प शोभेना । वाणी ती शोभेना कृतीविना ॥
तव स्मृति जिच्या वाचनीं होईना । कविता शोभेना तुजविना॥३७॥

कोणी म्हणे ठेवा विष्णुपदीं भाव । कोणी म्हणे शिव आळवावा ॥
कोणी म्हणे जपा मुखीं 'राम' नाम । कोणी म्हणे 'शाम' आळवावा
कोणी म्हणे 'अंबा' भजावी सुचित्त । कुणी म्हणे 'दत्त' कीं पूजावा॥
एका मूर्तीवरी टाकोनिया भार । मग व्यवहार चालू द्यावा ॥ ३८ ॥

नाना मंदिरांत नाना देवतांस । लववावें शीर्ष भक्तिभावें ॥
नाना धर्मांतील नाना साधुसंत । मन तद्बोधांत रमवावें ॥

सर्वांठायीं एक भरला अनंत । तत्व हें चित्तांत ठसवावें ॥
राहावें संसारीं संतोषस्थितींत । उपकारव्रत आचरावें ॥ ३९ ॥

'माझा कृष्ण मोठा' भीमसेन म्हणे । 'राम मोठा' म्हणे हनुमान ॥
भीम गदा घेई तोंच हनुमानें । दाविलें पुच्छानें तारांगण ॥
खालीं 'राम' ध्वनि वर ' कृष्ण ध्वनि ! धावे भक्त-धनी भगवान ॥
राम तोचि कृष्ण,कृष्ण तोचि राम । होई दासोत्तम समाधान॥४०॥

उद्यानांत पुष्पें, पुष्पांतरीं गंध । गंधांत आनंद भरलेला ॥
आकाशांत गोल गोलांत प्रकाश। प्रकाशांत हर्ष भरलेला ॥
भोपळ्याची वीण। वीणेची जी तार ! तारेंत सुस्वर भरलेला ॥
जगीं नाना लोक लोकांतरीं भाव। भावांतरीं देव भरलेला ॥ ४१ ॥

कळसावांचोनी मंदिर शोभेना । नगर शोभेना नदीविना ॥
शिखरावांचोनी पर्वत शोभेना । दुर्ग तो शोभेना ध्वजाविना ॥
शिखेवांचोनीया मयूर शोभेना । कानन शोभेना वृक्षाविना ॥
प्रातिभेवांचोनी कविता शोभेना। पूजाही शोभेना भक्तिविना ॥४२॥

सरोवरावीण कमल शोभेना । लतिका शोभेना वृक्षाविना ॥
मानसाच्यावीण हंस तो शोभेना। कोकिळ शोभेना आम्राविना ॥
कोंदणावांचोनी हीरक शोभेना । पयोद शोभेना नभाविना ॥
वेदाभ्यासावीण ब्राह्मण शोभेना । जीवित शोभेना भक्तिविना ॥४३॥

आकाशाची सीमा कोणीं ठरविली । कोणीं गणियेली तारापंक्ति ॥
समुद्राच्या तळीं अमूप जीं रत्नें ! कोणीं किती यत्नें मोजिलीं तीं ॥
वसुधेच्या पोटीं द्रव्यें भरलेलीं । कोणी ठरवीली त्यांची मिती ॥
भक्ताच्या चित्तांत ईश्वरी भावना । करीतां येईना तद्गणती ॥ ४४ ॥

पाप करी पापी शिक्षा ना तयाला। "देव झोंपी गेला" बोलूं नको ॥
भक्त करी भक्ती फळना तयाला। "देव झोंपी गेला" बोलूं नको ॥
बीज लावियेलें आलें तें फळाला। "देव जागा झाला" बोलूं नको ॥
आचरोनी कर्म भोग तूं कर्माला। उणें दैवताला लावूं नको ॥ ४५ ॥

मज त्रासवील दुःख हा देईल। भीतीनें गोपाळ भजूं नको ॥
मानियेलें ज्याला सोडूं नये त्याला। व्यर्थ संशयाला सेवूं नको ॥
तुझ्या हृदयांत उमटतो नाद। त्याच्याशीं विवाद घालूं नको ॥
तोच आहे देव तोच आहे धर्म। अंतरींचें मर्म सोडूं नको ॥ ४६ ॥

पागोटें गळालें जहालें दुश्चिन्ह। निघाला त्यांतून विंचू एक ॥
आडवें मार्जार थांबवी मार्गांत। गेला फोंफावत सर्प एक ॥
शुभ फलदायी दुश्चिन्हें जहालीं। तरी बुद्धी झाली ना निःशंक।
जगत्कल्याणाचा प्रभु मात्र ज्ञाता। कर्ता करवीता तोच एक ॥ ४७ ॥

एकाहातीं माती एकाहातीं सोनें। मोल एक जाणें साधु त्यांचें !॥
एकाहातीं काच एकाहातीं हिरा। मोल योगीश्वरा एक त्यांचें ! ॥
एकाहातीं लोह दुज्यांत परीस। मोल तपस्व्यास एक त्यांचें ! ॥
इह वैभवाशीं निःसारिलें ज्यांनीं। जाहले हो धनी ते मोक्षाचे ! ॥४८॥

श्वापदांत करी, करीहुन हरी। हरीहुन तरी मोठा कोण ! ॥
पक्ष्यांमाजी हंस, हंसींही गरुड। त्याशीं वरचढ तरी कोण ? ॥
वृक्षीं गंध वृक्ष, त्यांतही चंदन। सांगा त्याच्याहून श्रेष्ठ कोण ? ॥
नरामाजी योगी, योग्यांत गुरुही गुरुहुन महीं मोठा कोण ? ॥ ४९ ॥

वापी तडागांत आहेच सलील। भागीरथी-जल परी सेव्य ॥
वनोपवनांत आहेच चंदन। मलयचंदन परी सेव्य ॥

नदी निर्झरांत असती पाषाण । रेवा शालीग्राम परी सेव्य ॥
घरीं दारीं जो तो करीतोच बोध । सद्गुरूचा बोध परी सेव्य ॥

"गुरु महाराज' 'गुरु महाराज' । मुखें शिष्यराज बोलतसे ! ॥
तत्वासाठीं प्राण देणाऱ्यांची मान । ढोंगी धर्महीन कापीतसे ? ॥
गादीचा तो गुरु साधा भोळा प्राणी । शिष्याची करणी नेणतसे ? ॥
गुरु आणि शिष्य किती नांदतात । खोट्या लौकिकांत लोकीं ऐसे ५१

पंढरीचा मार्ग आक्रमितो कष्टीं । जेजूरीच्या गोष्टी बोलतसे ! ॥
पंढरी–पंढरी विठ्ठल नगरी । खंडोबाची वारी मागतसे ! ॥
मार्तंडाचा लावी भंडार कपाळीं । बुक्का लोकभालीं लावीतसे ! ॥
एक देव नाहीं एक भाव नाहीं । द्वैतभक्ति कां ही पावतसे !॥ ५२ ॥

सोनियाचा देव होता देव्हाऱ्यांत । गेला अकस्मात दिसेना तो ॥
एथें होता, गेला कोठें रंगनाथ । भक्ताच्या नेत्रांत पूर येतो ॥
सुचेना कांहींही बावरूनी चित्त । जीव कासावीस तेणें होतो ॥
सोन्यासाठीं सारा चालला आकांत । जाणे भगवंत सर्वज्ञ तो ॥५३॥

सोनियाची मूर्ती सोनारानें केली । भक्तालाच झाली वरदाई ॥
मातीचा गणेश कुंभारानें केला । इष्ट भजकाला फल देई ॥
पाषाणाचा देव पाथरवटें केला । पावे भविकाला लवलाही ॥
भक्तीच्या भावना ज्याच्या अंतरांत । त्याच्या कल्याणांत देव राही ॥५४॥

समुद्रास लाटा असंख्य उठती । त्यांतच विरती सर्वकाळीं ॥
नभीं वर्षामेघ किती उद्भवती । त्यांतच विरती शरत्कालीं ॥
गिरीं वनस्पती किती उगवती । तेथेंच वाळती उष्णकाळीं ॥
भक्तीच्या लहरी तवीं भक्त चित्तीं । उठती विरती वेळोवेळीं ॥ ५५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, नोंद नं. २०६६ २७-२-१९५६ ठाणे

तुझें एक ध्यान हरपलें भान। नादांत रंगून हार केला ॥
परिमलहीन सौंदर्यविहीन। माझी ही अर्पण पुष्पमाला ॥
तूंच शबरीच्या सेविलें बोराला। प्रेमाचा उमाळा ओळखीला ॥
नको दोष पाहूं दास मी पायाचा। असूं दे खुणेचा माझा शेला ॥५६॥

धनुष्याचा बाण ओढोनी सोडिला। परतोनी आला काय केव्हां? ॥
तोफेचा जो गोळा एकदां उडाला। परतोनी आला काय केव्हां ?॥
शैलशृंगाहूनी प्रपात उडाला। मागें ओसरला काय केव्हां ? ॥
सज्जनाचा शब्द एकदां निघाला। मागें घेई त्याला काय केव्हां ?॥५७॥

खडगाची धार, सज्जनाचें व्रत। दोन्हीही तिखट कर्तव्यांत ! ॥
चापाचा टंकार, शूराचा हुंकार। दोन्हीही गंभीर श्रवणांत ? ॥
तत्वज्ञांचा वाद, साधूचा प्रसाद। दोन्हीही अगाध मंडलांत ॥
विद्युल्लता-पात, सतीचा निश्चय। दोन्ही अनिवार्य भूतलांत ?॥५८॥

बरवा तो चंद्र दूर आकाशांत। ज्या योगें चकोर संतोषती ? ॥
बरवा तो सूर्य दूर गगानांत। ज्या योगें सरोज प्रफुल्लती ! ॥
बरवा तो मेघ दूर अंबरांत। ज्यायोगें चातक आनंदती ! ॥
जोंवरी सद्गुणी अलिप्त रहाती। तोंवरी महती पावताती ! ॥ ५९ ॥

हिरव्या वेलींनीं काट्यांचें कुंपण। झांकोनी नूतन शोभा येई ॥
शुभ्र जलौघानें पाषाण लोपती। तुषारांची पंक्ति तोष देई ॥
पुष्पवृक्ष वेली यांनीं वेष्टिलेली। कुटिकाही झाली मोददायी ॥
जगतीं जे हीन योग्यताविहीन। श्रेष्ठपदीं लीन होवो कांहीं ॥६०॥

वटपिंपळाच्या संगें निंब वाढे। लोक हात जोडे त्रिवेणीला ॥
नद्यांच्या संगमीं, ओहोळ मिळाला। लोक ये स्नानाला त्रिवेणीला

ग्रंथ संग्रहालय

नदीं निर्झरांत असती पाषाण । रेवा शालीग्राम परी सेव्य ॥
घरींदारीं जो तो करीतोच बोध । सद्गुरूचा बोध परी सेव्य ॥

"गुरु महाराज' 'गुरु महाराज' । मुखें शिष्यराज बोलतसे ! ॥
तत्वासाठीं प्राण देणाऱ्यांची मान । ढोंगी धर्महीन कापीतसे ? ॥
गादीचा तो गुरु साधा भोळा प्राणी । शिष्याची करणी नेणतसे ? ॥
गुरु आणि शिष्य किती नांदतात । खोट्या लौकिकांत लोकीं ऐसे५१

पंढरीचा मार्ग आक्रमितो कष्टीं । जेजूरीच्या गोष्टी बोलतसे ! ॥
पंढरी-पंढरी विठ्ठल नगरी । खंडोबाची वारी मागतसे ! ॥
मार्तंडाचा लावी भंडार कपाळीं । बुक्का लोकभालीं लावीतसे ! ॥
एक देव नाहीं एक भाव नाहीं । द्वैतभक्ति कां ही पावतसे !॥ ५२ ॥

सोनियाचा देव होता देव्हाऱ्यांत । गेला अकस्मात दिसेना तो ॥
एथें होता, गेला कोठें रंगनाथ । भक्ताच्या नेत्रांत पूर येतो ॥
सुचेना कांहींही बावरूनी चित्त । जीव कासावीस तेणें होतो ॥
सोन्यासाठीं सारा चालला आकांत । जाणे भगवंत सर्वज्ञ तो ॥५३॥

सोनियाची मूर्ती सोनारानें केली । भक्तालाच झाली वरदाई ॥
मातीचा गणेश कुंभारानें केला । इष्ट भजकाला फल देई ॥
पाषाणाचा देव पाथरवटें केला । पावे भविकाला लवलाही ॥
भक्तीच्या भावना ज्याच्या अंतरांत । त्याच्या कल्याणांत देव राही ॥५४॥

समुद्रास लाटा असंख्य उठती । त्यांतच विरती सर्वकाळीं ॥
नभीं वर्षामेघ किती उद्भवती । त्यांतच विरती शरत्कालीं ॥
गिरीं वनस्पती किती उगवती । तेथेंच वाळती उष्णकाळीं ॥
भक्तीच्या लहरी तेवीं भक्त चित्तीं । उठती विरती वेळोवेळीं ॥ ५५ ॥

मराठी ग्रंथ संग्रह
नोंद नं. २०६
ठाणे,

तुझें एक ध्यान हरपलें भान। नादांत रंगून हार केला ॥
परिमलहीन सौंदर्यविहीन। माझी ही अर्पण पुष्पमाला ॥
तूंच शबरीच्या सेविलें बोराला। प्रेमाचा उमाळा ओळखीला ॥
नको दोष पाहूं दास मी पायाचा। असूं दे खुणेचा माझा शेला ॥५६॥

धनुष्याचा बाण ओढोनी सोडिला। परतोनी आला काय केव्हां? ॥
तोफेचा जो गोळा एकदां उडाला। परतोनी आला काय केव्हां ?॥
शैलशृंगाहूनी प्रपात उडाला। मागें ओसरला काय केव्हां ? ॥
सज्जनाचा शब्द एकदां निघाला। मागें घेई त्याला काय केव्हां ?॥५७॥

खडगाची धार, सज्जनाचें व्रत। दोन्हीही तिखट कर्तव्यांत ! ॥
चापाचा टंकार, शूराचा हुंकार। दोन्हीही गंभीर श्रवणांत ? ॥
तत्वज्ञांचा वाद, साधूचा प्रसाद। दोन्हीही अगाध मंडलांत ॥
विद्युल्लता-पात, सतीचा निश्चय। दोन्ही अनिवार्य भूतलांत ?॥५८॥

बरवा तो चंद्र दूर आकाशांत। ज्या योगें चकोर संतोषती ? ॥
बरवा तो सूर्य दूर गगनांत। ज्या योगें सरोज प्रफुल्लती ! ॥
बरवा तो मेघ दूर अंबरांत। ज्यायोगें चातक आनंदती ! ॥
जोंवरी सद्गुणी अलिप्त रहाती। तोंवरी महती पावताती ! ॥ ५९ ॥

हिरव्या वेलींनीं काटयांचें कुंपण। झांकोनी नूतन शोभा येई ॥
शुभ्र जलौघानें पाषाण लोपती। तुषारांची पंक्ति तोष देई ॥
पुष्पवृक्ष वेली यांनीं वेष्टिलेली। कुटिकाही झाली मोददायी ॥
जगतीं जे हीन योग्यताविहीन। श्रेष्ठपदीं लीन होवो कांहीं ॥६०॥

वटपिंपळाच्या संगें निंब वाढे। लोक हात जोडे त्रिवेणीला ॥
नद्यांच्या संगमीं, ओहोळ मिळाला। लोक ये स्नानाला त्रिवेणीला

संत साधु संगें, पोटभरू चाले। तिथें वंद्य झाल, भाविकाला ॥
दोघांच्या पावित्र्यीं, तिसरा पवित्र। मानण्याची रीत जगताला ॥६१॥

आंब्याला का कोठें तोरणें बांधावीं। लागतात लोकीं सत्कार्याशीं ॥
दिव्याच्या ज्योतींत सूर्योपासकास। बघावें कां लागे त्या सूर्याशीं ॥
मैलागिरीदेहीं चंदनाचा गंध। लावावा लागे का पूजनाशीं ॥
मूर्त पावित्र्याचे मूर्त सद्गुणाचे। मांगल्य तयांचे संन्निवाशीं? ॥६२॥

फणसाची गोडी सेवितां सेवितां। कंटकांची निंदा कशाला हो ॥
चंदनाचा गंध लावितां लावितां। सर्पसंग वार्ता कशाला हो ॥
कोकिलाचा स्वर ऐकतां ऐकतां। त्याची जन्मकथा कशाला हो ॥
गुणश्रेष्ठ जे जे गुणानंदीं त्यांच्या। अवगुण-चर्चा कशाला हो ॥६३॥

कुसुमाची शोभा दुरोनी पहावी। शरीरीं नखही लावूं नये ॥
कोकिळाची वाणी दुरोनी ऐकावी। मधें कटुवाणी बोलूं नये ॥
मोराचा पिसारा दुरोनी पहावा। कांहीं आविर्भावा दावूं नये ॥
नैसर्गिक गुणी गुणमग्न होतां। आपण धृष्टता सेवूं नये ॥ ६४ ॥

कमलानें व्हावें सर्वांगीं प्रफुल्ल। भ्रमर येतील आपोआप ॥
कुमुदानें व्हावें सौंदर्यें उत्फुल्ल। चकोर येतील आपोआप ! ॥
फुलो काननांत आम्र तो रसाळ। येतील कोकीळ आपोआप ! ॥
तैसा गुणवंत पसरो स्वगुण। येतील गुणज्ञ तत्समीप ! ॥ ६५ ॥

बैसला बैसला कोकीळ उडाला। आम्रानें तयाला दोषूं नये ॥
खेळला खेळला हंस दूर गेला। पद्मिनीनें त्याला निंदूं नये ॥
बोलला बोलला शुक स्तब्ध झाला। गुणज्ञानें त्याला बोलूं नये ॥
रसिक सुगुणी असती स्वच्छंद। तेणें सर्वानिंद्य मानूं नये ? ॥ ६६ ॥

ग्रं. क्र.



काल डावा डोळा फार फडकला । आज उजव्याला चाळा लागे ॥
काल डावा हात फार खाजवला । आज उजव्याला खाज लागे ! ॥
काल घुबडाचें दर्शन जहालें । आज तास बोले सव्य मार्गें ! ॥
स्वार्थ भोळे लोक अंध विश्वासाचे । सुखदुःख त्यांचें रोज जागे ! !

अग्निमुखामाजीं सोन्याची परीक्षा । हि-याची परीक्षा घणाखालीं !
तीक्ष्णमुखावरी बाणाची परीक्षा । खड्गाची परीक्षा धारेखालीं ! ॥
तीव्र गतिवरी अश्वाची परीक्षा । गजाची परीक्षा गंडस्थळीं ! ॥
महासभास्थानीं विद्वान परीक्षा । शूराची परीक्षा युद्धस्थळीं!॥६८।

सलिलावांचोनी पद्म तें शोभेना । सलिल शोभेना पद्माविना ॥
रजनीवांचोनी चंद्र तो शोभेना । रजनी शोभेना चंद्राविना॥
कंकणावांचोनी हस्त तो शोभेना ! कंकण शोभेना हस्ताविना ॥
तैसा भूपावीण कवि तो शोभेना । भूपहि शोभेना कात्रेविना ॥६९ ॥

बोलूं नये कटु सत्य तें बोललों । मग धैर्य काय सोडावें तें ॥
दिव्य भावनेंत दिव्य आचरीलें । मग काय भय मानावें तें ॥
वर्तमान काळ स्वार्थ संबंधाचा । भावी काळ सेवी सत्यत्वातें ॥
सत्यधर्म जरी सेवायाचा तरी । जगताचें सारी दूर नातें ॥ ७० ॥

केवळ सलिल प्राशोनिया राहूं । तव नच सेवूं पक्वान्नातें ॥
फाटकी घोंगडी पांघरोनी राहूं । तव नच सेवूं सद्वस्त्रातें ॥
जुन्या झोंपडींत आनंदानें राहूं । तव नच सेवूं प्रासादातें ॥
शारदेचे भक्त शारदोद्यानांत । तुच्छ लेखितात वैभवातें ॥ ७१

चंदनास काय स्वगंधोपयोग । त्याचा उपयोग जगताला ॥
हरिणास काय कस्तुरीचा वास । तियेचा संतोष जगताला ॥

वृक्षालागीं काय पुष्प फलोत्पत्ती । त्यांची उपभुक्ति जगताला ॥
निःस्वार्थी जे लोक त्यांचें दृढव्रत । करी उपकृत जगताला ॥७२॥

वेताळाच्या स्कंधीं बैसानी का कोणी । नाम प्रसिद्धीला पावतसे॥
जांबुवंताच्या का मुखाग्रीं बैसोनी । गौरवार्ह कोणी तो होतसे ॥
भस्मासुराच्या कां कोणी तळहातीं । बैसोनियां कीर्ती पावतसे॥
आपुलेंचि तप आपुलेंचि पुण्य । लौकिकास मान्य करीतसे ॥७३॥

काय ती कविता काय ती वनिता । रसज्ञांच्या चित्ता जी मोहीना॥
काय तो विद्वत्ता काय ती वाटिका । मानासिक दुःखा जी हारीना ॥
काय ती गुरुता काय ती सरिता । लागलेली तृषा जी वारीना ॥
काय तें जीवित काय तें कर्तृत्व । कुल कीर्तीवंत जें करीना ॥७४॥

हिंसकाला सांगा कितीही पापाच्या । कथा त्या हत्येच्या फळ काय॥
वेश्येलागी सांगा सजवोनी ओष्टीं । पातिव्रत्य गोष्टी फळ काय ॥
नास्तिकाला सांगा जगन्नायकाच्या । लीला कौतुकाच्या फळ काय॥
स्वभावाचें मूळ विषारीच जेथें । बोधजल तेथें करी काय ॥ ७५ ॥

वेश्येस सांपडे अनाथ कुमारी । ममतेचा भारी पूर वाही ॥
कसायास गाय सांपडे अनाथ । दयामय चित्त त्याचें होई ॥
घटोत्कची माया वरूनी दाविती । अंतीं दुष्ट होती तापदाई ॥
भूतदया आणि परोपकाराचे । मार्ग अधमांचें पाप डोहीं ॥ ७६ ॥

एक मधुबिंदु क्षारसमुद्राची । घालवी विरुची तरी कैसा ॥
एक जलबिंदु दीप्त दावानल । प्रशांत करील तरी कैसा ॥
एक नभस्तारा गाढ अंधाराला । निरवावयाला शक्त कैसा ॥
एक बोधशब्द तीव्र अज्ञानाला ! घालवावयाला शक्त कैसा ॥७७॥

उंटाचें तें काय सरळ हो साच । वक्र अवघाच देह त्याचा ॥
अस्वलाचें रूप कोणतें निर्मळ । साराच केसाळ देह त्याचा ॥
गाढवाचें गात्र कोणतें पवित्र । सारा अपवित्र देह त्याचा ॥
कोणता सुगुण नीच दुर्जनांत । पुतळाच मूर्त दुर्गुणाचा ॥ ७८ ॥

आम्राच्या छायेंत स्तवियेला आम्र । प्रशंसिला निंब निंबाखालीं॥
समुद्राच्या तीरीं समुद्र वर्णिला । नदीतीरीं तिला वाखाणिली ॥
केतकी वर्णिली पुष्प वाटिकेंत । निर्गुंडी वनांत प्रशंसिली ॥
कार्यसाधु जे जे अभिप्रायें त्यांच्या । निर्णयाची इच्छा कोणीं केली७९

आंधळा दावितो मार्ग आंधळ्याला । उद्धरी पांगळा पांगळ्यांशीं ॥
मूकाचें वक्तृत्व मूकाशीं संपूर्ण । बाधिराचें गान बधिराशीं ॥
धर्मभ्रष्ट करी भ्रष्टास सद्बोध । पापी करी शुद्ध पापियाशीं ॥
कोणी हे लावावे सन्मार्गास जीव । गुरु अनुभव त्यांचा त्यांशीं ॥८०॥

कैसा समुद्राचा काढावा हो गाळ । कैसा जन्मखल निर्मळावा ॥
कैसा कालियाचा सोडवावा फासा । दुराचारी कैसा निरवावा ॥
कैसें पचवावें तीव्र हालाहल । कैसा खलबोल पचवावा ॥
निर्जन वनांत निघोनी कीं जावें । तुज आळवावें वाटे देवा ॥ ८१ ॥

मगर सुसर बरवा तत्स्नेह । स्वार्थ लोलूपांचा स्नेह नको ॥
सिंह व्याघ्र पशु बरवी तन्मैत्री । विश्वासघातकी मैत्री नको ॥
वृश्चिक भुजंग बरवा तत्संग । मर्मभेदकांचा संग नको ॥
समुद्राच्या तीरीं राहावें कांतरीं । देवा यांचें परी मुख नको ॥८२॥

दुःखें जों गांजला विद्वच्चूडामणी । मूर्ख होय ज्ञानी बोधायाला ॥
दैवें जों पीडीला शूर रणधीर । पुढें ये अधीर वंचायाला ॥

भोग पुढें आला सुनीतिमंताला । संधी तीच खलां हंसायाला ॥
पडत्या काळांत पतिताचि फार । करिताती वार काळजाला ॥८३॥

केतकीभोंवती मधुपाचा नाद । ऐकोनिया नाग उफाळला ॥
फुत्कार सोडीतो फणा आपटीतो । गरळ ओकीतो केतकीला ॥
त्रासला गळाला आला भूतळाला । गरुडानें नेला गगनाला ॥
विधि सयोगांत विघ्नक होतात । नीच पावतात शासनाला ॥ ८४॥

बाजेचा माचवा ढेकणाचा गढ । वारुळ हा गढ भुजंगाचा ॥
मातीचें ढेकुळ विंचवाचा गढ । मस्तक हा गढ कीं ऊवांचा ॥
नदीची दरड खेकडाचा गढ । गेहछिद्र गढ मूषकांचा ॥
हीनाचारी त्यांचा देह-संनिवास । रुचिर स्थानास ना व्हायाचा॥८५

चंदनाशेजारीं निंब तो लाविला । शेवटीं लिंबोळ्या आल्या त्यास ॥
आम्राच्या शेजारीं बाभूळ लाविली । शेवटीं ती ल्याली-कंटकास ॥
कदंबाशेजारीं धोतरा लाविला । शेवटीं तो ल्याला विषत्वास ॥
सज्जनाशेजारीं नीच राहोनीही । सोडिती न कांहीं स्वधर्मास ॥ ८६॥

गिधाडांचा मेळा नाचे संतोषून । कोकीळ चुकून-तेथें गेला ॥
आग्रह तयाला गायनाचा झाला । पंचमाचा गळा ऐकवीला ॥
"ही ही ही" करोनी मांसखंड हेती । अवमानिताती मूर्ख त्याला॥
मूर्खांच्या सभेंत गेलाही चुकून । काय पावे सूज्ञ-सन्मानाला ॥८७॥

समुद्राच्या पोटीं रत्नें निपजतीं । शंखही जन्मती त्याच्या पोटीं॥
आकाशाच्या पोटीं सूर्यचंद्र पाही । धूमकेतु तेही त्याच्या पोटीं ॥
मानसाच्या तीरीं हंस जन्म घेती । बेडुक ही किती उपजती ॥
एकस्थानीं जन्म एकस्थानीं वास । ज्याचे गुण त्यास निवडीती॥८८

शंकराच्या कंठीं वास भुजंगाचा । विषधर्म त्याचा तो सोडीना ॥
विष्णुहस्तीं ठाव लाधेही शंखाला । अंतर्वक्रतेला तो सोडीना ॥
स्वर्गीच्या देवांनीं यत्नें जो मंथीला । अब्धि क्षारत्वाला तो सोडीना ॥
मूळचे दुर्गुणी त्यांच्या दुर्गुणास । निरखावयास शक्ती कोणा ॥ ८९ ॥

ओळख नसतां स्तुति जो करीतो । जाणावा ठक तो कार्यसाधू ॥
घरीं येऊनीया सांगतो हितास । ओळखावा त्यास दुष्ट भोंदू ॥
बोलतां बोलतां सोडितो स्वभाव । सोडावा तत्स्नेह विषस्वादू ॥
विपरीत चिन्हें ज्याचीं साक्ष देतीं । त्याची अंतर्वृत्ति नये शोधूं ॥ ९० ॥

क्षणोक्षणीं काटे बोंचतात फार । टाळावा विहार ऐशा रानीं ॥
जेव्हां तेव्हां हिंस्र पशू ओरडती । सेवूं नये शांती त्या काननीं ॥
जेव्हां तेव्हां उग्र पेटे ज्वालामुखी । मानूं नये सुखी तेथें कोणी ॥
वारंवार जेथें मनस्ताप होई । दूरदूर राही त्यापासोनी ॥ ९१ ॥

राक्षसाशीं आव ब्रह्मराक्षसाचा । तेव्हांच तयाचा त्रास मिटे ॥
भूतासंगें व्हावें महाभूत जेव्हां । छलकाचा तेव्हां छळ मिटे ॥
रुद्रासह व्हावें महारुद्र जेव्हां । उग्रतेचा तेव्हां कांटा तुटे ॥
त्याची डुरकणी आपुली गर्जना । कैसा त्याच्याविना घोर सुटे ॥ ९२ ॥

जेथें मंडुकांचें घोष करी सैन्य । पल्वलांचें स्थान जाणावें तें ॥
जेथें गृध्र-सेना-नाचे संतोषून । पशूंचें स्मशान-जाणावें तें ॥
जेथें लंबकर्ण कारितात गान । कुंभाराचें स्थान जाणावें तें ॥
पामर नांदती जेथें आनंदांत ! जाणतात संत कुग्रामातें ॥ ९३ ॥

बायकांत केल्या पौरुषाच्या गोष्टी । षंढ अश्वपृष्ठीं आरूढला ॥
युद्धाचा गजर झाला एकवार । घोडा पाणीदार उसळला ॥

सुटे तेव्हां ढाल गळे तलवार। वरचा तो स्वार खालीं आला ॥
शूरत्वाच्या गोष्टी शोभती शूराला। आणि इतराला व्यर्थ चाळा॥१४॥

गाढवांचा धनी अश्वीं चढविला। सेनापति केला कुंभाराला ॥
चढली जों स्वारी वर चार बोटें। स्वर्ग चार बोटें राहे त्याला ॥
खरांची घोषणा ज्याच्या नित्य कानीं। त्यानें रणध्वनि आयकिला ॥
सेनेच्या आधींच सेनानी पळाला। योजक नृपाला खेद झाला॥१५॥

पावसाच्या येती सरीवर सरी। खालीं आणि वरी पाणी पाणी॥
नभ गडगडे वीज कडकडे। लवतातीं झाडें रानोरानीं ॥
तेव्हां माकडास गेह बांधण्याची। बुद्धि होई साची प्रतिक्षणीं ॥
गेला पावसाळा आला जों हिवाळा। स्वच्छंदी तो गेला विसरोनी॥१६

गळ्याची सांखळी सुटे हातांतली। माकडानें केली चपळाई ॥
वृक्षाची जी शाखा शाखेचे जे गुच्छ। गुच्छांत सपुच्छ उडी घेई॥
तेथें धडपड व्यर्थ चालविली। साखळी डहाळी एक झाली ॥
सांपडला हातीं तेव्हां दुःख किती। देह आणि माती एक झाली॥१७॥

क्षुधा शांत झाली तृषा शांत झाली। माकडानीं केली नवलाई ॥
रामायण-काळ आठवला त्यातें। जागा खेळायातें आमराई ॥
'राम' होई एक 'लक्ष्मण' एक। 'हनुमंत' एक भक्त होई ॥
परी 'दशानन' होई एकही न। झालें घोर रण त्याच ठायीं ।१८॥

तेलियास झाला नवसानें बाळ। घाण्याचा तो बैल रडूं लागे ॥
कुंभारास झाला नवसानें लेक। गाढवच एक रडूं लागे ॥
वृषभ गर्दभ भेटले काननीं। ज्याची तो कहाणी सांगूं लागे ॥
एक म्हणे आतां घाणा नित्य मानीं। दुजा म्हणे गोणी पाठी लागे॥१९॥

दोघे ढोंगी एका देउळीं राहिले । दोघांनीं झाकिले नेत्र दोन्ही ॥
एक दुसऱ्याला चोरुनिया पाही । ढोंगी लवलाही ठरे जनीं ॥
त्याच्यापुढें कोणी ठेविना प्रसाद । दुज्याचा प्रसाद घे हिरोनी ॥
तोंच उतरली त्याचीही समाधी । जहाली उपाधी देवस्थानीं ॥१००॥

जेथें हंस खाई कमलाचा चारा । बक एरझारा घालिताती ॥
जेथें गरुडानें मारिल्या भराऱ्या । वाघुळें तीं फेऱ्या घालिताती ॥
जेथें पंचानन गर्जे भव्य नादें । जंबुक दुःशब्दें ओरडती ॥
जेथें मानसिंह मानकीर्ति जोडे । तेथें श्वान हाडें चघळती ॥१०१॥

वनचरा हातीं हिरा सांपडला । विभ्रमें तो त्याला काच मानी ॥
काचमणिमाला घालितसे गळां । ऐशा फकिराला द आपोंनी ॥
मागोनि कळालें भाग्यहीन नरा । गेला गेला हीरा हातांतुनी ॥
दारिद्र्याचा ताप त्यांत अनुताप । करितो विलाप अल्पज्ञानी ॥१०२॥

मदिरेचा धनी त्यानें जाहिरात । दिली जगतांत अमृताची ॥
ताडवन-स्वामी त्यानें जाहिरात । दिली जगतांत गोरसाची ॥
माळऱ्याचा राजा त्यानें जाहिरात । दिली जगतांत कस्तुरीची ॥
इतुके जगाला मूर्ख समजती । उपहास कीर्ती हीच त्यांची ॥१०३॥

ज्याच्या तोंडीं येई मदिरेचा वास । काय तो लोकांस सुधा देई ॥
ज्याच्या आवारांत बाभळीचे फांस । हार रसिकास कैसा देई ॥
ज्याच्या द्वारीं मत्त डुलती महिष । लोकीं तो पायस कैसा देई ॥
नित्य जो विवादीं उग्रसेन भाले । काव्यमधु कैसें लोकां देई ॥१०४

अनुभव आला ज्ञाता तूंच झाला । निश्चय त्वां केला अंतरींचा ॥
नको बोलूं बापा मनाचा संकल्प । शिणवी न अल्प दृढ वाचा ॥

वाहिली शपथ तुझी तुज ठावी। देव साक्ष ठेवी आधाराचा ॥
कृती आचरून घेई वदवून। मुखीं शब्द 'धन्य' लौकिकाचा ॥१०५॥

आपुलेंच नाहीं स्वच्छ घरदार। परक्यांचा केर कां काढावा ॥
आपुलीच नाहीं प्रेममय वाचा। शिव्या परक्यांच्या कां मोजाव्या ॥
आपुल्याच नाहीं शोधिलें चित्तास। बोल परक्यास कां लावावा ॥
अंतर्दृष्टी आधीं तुझी तूंच कर। तुवां पर-भार कां वाहावा ॥१०६॥

अनाठायीं जरी दाविला विनय। तिथें अहंकार पीडा देई ॥
अस्थानीं जरीही लवविलें शिर। तिथें अधिकार त्रास देई ॥
भलत्याच ठायीं केला उपकार। तिथें दुराचार खेद देई ॥
आधीं सारासार करावा विचार। मग जें होणार होवो कांहीं॥१०७॥

हातीं घेतां माती होत होतें सोनें। माती मोल जीणें आज होय ॥
हातीं घेतां धोंडा होत होता देव। धोंड्यापरी दैव आज होय ॥
उलटला काळ उलटले दिन। न काढी वचन 'हायहाय'॥
भोग देवांनाही चुकलेले नाहीं। स्वस्थ राही पाही नवलाई॥१०८॥

खाटिकाचे गेहीं-चघळूनी हाड। भुकंतसे श्वान-अंगावरी ॥
अकारण राग-अकरुण भाषा। दावितो तमाशा-दुराचारी ॥
काय त्याच्या नादीं-लागोनीया कोणा।कीर्तिलाभ झाला-लोकांतरीं॥
करंट्याचीं विघ्नें-आडवीं न येतीं। कर्तृत्ववानांच्या-कार्यांतरीं॥१०९॥

पारध्याचें लक्ष्य-कस्तुरी मृगाशीं। धरीतो हाताशीं श्वानालागीं ॥
जाळें लावोनीया-वेळ पाहोनीया। खूण करोनीया-सोडी वेगीं ॥
शिकारीची मौज-संतोषे[1] पाहोनी। कृष्णकारस्थानी-वाममार्गी ॥
सज्जनांचे वैरी-संभावित नीच।त्यांचा मार्ग हाच-पापोद्योगी॥११०॥

---

१ आनंदित होइ

२५६९

कुंभाराचा खर-भुंकतो कशाला। कारण तयाला पुसूं नका ॥
मदारीवाल्याचा-घुमतो कां रीस। कारण तयास पुसूं नका ॥
फेरिस्त्याचा उंट-हालवी कां ओठ। कारणाची गोष्ट पुसूं नका ॥
जगाच्या मूर्खांचा-जन्माचा जो दोष। करोनी सायास-जातो
तो कां ॥ १११ ॥

आम्रवृक्षावरीं बांडगुळ वाढे। काय आम्रफळें येती त्यास ॥
भुजंगम वाढे मलयाद्रिदेहीं। काय त्यास येई गंधोल्हास ॥
सिंहद्वारीं होई श्वान देहपुष्ट। काय पावे त्याच्या योग्यतेस ॥
जरी नीच वाढे गेहीं कुलीनांच्या। काय पावे त्यांच्या सद्गुणांस॥११२

सिंहाचिया स्थानीं बैसला कोल्हा। कोल्होबाही झाला मृगराज,॥
आली वेळ तेव्हां करी कोल्हेकुई। अंतरीं न वाही लोकलाज॥
रत्नाचिया स्थानीं बैसविली गार। काय दावणार आत्मतेज॥
दोष नाहीं तीचा, आहे योजकांचा। पश्चात्ताप त्यांचा त्यास
रोज ॥११३॥

डाळिंबाच्या मोहें शुक कौठावरी। चंचुघात करी एकाएकी ॥
अडकोनी चोंच निघेना फिरोनी। कलकल वाणी करी शोकीं ॥
यत्नाचा शेवट देहत्रास होई। सुटे लवलाही पंची पक्षी ॥
रसिकांचा योग कठिणाशीं आला। देहसंकटाला पावे लोकीं॥११४॥

मत्सराच्या पक्षीं आसन घालून। सागर तरून गेला कोण॥
मंडुकाच्या पृष्ठीं स्वारी चढवून। हिमाद्रि लंघून गेला कोण ॥
माकडाचें पुच्छ दृढ आवळून। मेघ मंडळाला गेला कोण॥
शब्द घोषकारी पामरा सेवून। सांगा कीर्तिमान झाला कोण?॥११५॥

धेनुस्तनीं राहे गोचिडांचा मेळा । सोडोनी दुग्धाला रक्त शोषी ॥
मानसाच्या तीरीं भेक पंकजाला । सोडोनी, पंकाला सेविताती ॥
उद्यानीं कीटक पुष्पसौगंधास । सोडोनी देठास भक्षिताती ॥
रसिकांचा रस अभाग्यांच्या कांहीं । लिहिलाच नाहीं भालप्रांतीं ११६

सर्पस्नेह केला-फळ सांगायाला ! ज्योतिषी कशाला-पाहिजे हो ॥
नक्रसंग केला-गति सांगायला । दैवज्ञ कां त्याला-पाहिजे हो ॥
विषारी वल्लीचा-कथाया अपाय । धन्वंतरी काय-पाहिजे हो ॥
ओळखोनी लोक-दुष्ट हृदयाचे । कोणीही न त्यांचें-तोंड पाहो॥११७॥

काजळाच्या गेहीं-कितीही सांभाळा । एकतरी डाग-लागायाचा॥
कंटकांच्या रानीं-पाहोनीही चाला । एकतरी कांटा-बोचायाचा ॥
किटकांच्या स्थानीं-हळु पाय ठेवा । एकतरी दुष्ट-चावायाचा ॥
कुग्रामांत वास-कुजनांचा योग । एकतरी भोग-तो यायाचा ॥११८॥

निंबाचिया काष्ठा-लेप चंदनाचा । विके चंदनाच्या मोलानें तें ॥
देहें झिजण्याची-लोकीं वेळ येई । कटु वास येई-तेव्हां त्यातें ॥
नीचकुलोत्पन्न-सज्जनांचें रूप । दावोत अमूप-सामान्यातें ॥
लोकहितकार्यीं-कष्ट सोसण्याची । परीक्षा तयांची-होई तेथें ॥११९॥

कडु कारल्याची-शेतें पिकवोनी । धनी झाला कोणी ऐकिलें का॥
काष्ठाच्या खड्गानें-शत्रूस जिंकोनी । शूर झाला कोणी-ऐकिलें का ॥
कोणीं एरंडाचें-गुऱ्हाळ लाविलें । वित्त मेळविलें-ऐकिलें का ॥
उन्मत्तांचे वाडे-नित्य ऐश्वर्यांत । नांदले जगांत-पाहिलें कां॥१२०॥

अमृतासमान-नीर वर्षताती । मेघ ना याचिती-नमस्कार ॥
नित्य मलीनांचा मळ क्षाळिताती । नद्या ना वांछिती-नमस्कार ॥

वृक्ष फल-पुष्पें-छाया अर्पिताती । कुणा ना मागती-नमस्कार ॥
नाहीं भूतदया नाहीं उपकृती । उन्मत्त वांछिती-नमस्कार ॥१२१॥

एका उद्यानांत-एक पुष्करिणी । एकच सुवर्णी-पद्म तेथें ॥
नित्य विकसावें-सौंदर्यें हंसावें । वायूनें डोलावें त्यानें तेथें ॥
तीरावर कोळी-नाना उपायांत । झाला बहु त्रस्त-लाधेना तें ॥
शेवटीं मुर्खानें-पाषाण फेंकिले । छिन्नभिन्न केलें-त्या पद्मातें ॥१२२॥

कीटकांचा जेथ-समूह मातला । भ्रमर पुष्पाला-सोडिताती ॥
मंडुकांचा जेथ-कल्लोळ माजला । हंस पल्वलाला सोडिताती ॥
वायसांचा जेथ-कल्लोळ जाहला । पिक त्या अम्राला सोडिताती ॥
मूढवृंद जेथें-प्रमत्त जहाला । कवि भूपालाला-सोडिताती ॥१२३॥

अल्पगुणी मागे बहुगुणमान । न तरी तो श्वान भुंकूं लागे ॥
आपुल्या दोषांची मालिका गुंफून । दुजाच्या कंठांत घालूं लागे ॥
अपशब्दारंभ प्रारंभींच जेथें । सूज्ञ पाय तेथें घेती मागें ॥
ऐसा पशू जरी यत्नें शांतविला । तरी कां स्नेहाला मन लागे॥१२४

अधिकारी लोक दिसती ताठ्यांत । तैसे धनवंत अभिमानी ॥
बुद्धिमंत तेही मत्सरीं बुडाले । विवादी जहाल कवि जनीं ॥
कोणापाशीं जावें मन रिझवाया । चित्तास कराया समाधानी ॥
संतसाधुसंग किंवा प्रभूनाम । नसो मनःकाम या वांचोनी ॥१२५॥

तुझ्या आणि माझ्या हृदयांत रेषा । उमटून भाषा-स्पष्ट झाली ॥
जीविताचे माग भिन्न भिन्न झाले । दोन ओघ झाले एका जलीं ॥
अभिन्न हृदयीं एक जीवभाव । परी प्रीति-नाव-ही बुडाली ॥
ज्याचा पंथ त्यानें आक्रमावा आतां । बुझवावें चित्ता-सर्व कालीं१२६

पराच्या पंखाशीं पंख जुळवून । मज आवडे न नभःक्रीडा ॥
इतरांच्या संगें धावून धावून । रुचे मजला न वनक्रीडा ॥
आपुल्या छंदांत आपुल्या नादांत । आपुल्या नादांत जीव वेडा ॥
निंदा आणि स्तुति आयकूं येईना । स्वातंत्र्याचा लागे मनीं ओढा
॥ १२७ ॥

तुझ्या पासुनीया लाभ बा नव्हता । लोभ मात्र होता तुझ्यावरी ॥
इच्छाच नव्हती मिळो धनधान्य । प्रेमाचें निधान तूं शेजारी ॥
अकस्मात गेला पांखरा उडून । जिव्हाळा लावून मदंतरीं ॥
वैभवाच्या वृक्षीं घेशील विसावा । पाहीन मी केव्हां केव्हां तरी
॥ १२८ ॥

जेथें माझ्यापायीं रुतले कंटक । तथील हीं फुलें देवा माझीं ॥
जेथें माझ्यावरी उफळे शार्दूल । पाडसें तेथील प्रीय माझीं ॥
दुःखाचा उन्हाळा यास देवा देवा । दाखवी न केव्हां जगामाजीं ॥
माझें जें सुकृत माझें जें संचीत । पडो तें निश्चित त्यांच्या काजीं !
॥ १२९ ॥

कुळिथाची वेल पाण्यानें शिंपिली । मांडवास गेली काय केव्हां ॥
जरी हरभरा बांधाशीं लाविला । गगनाला गेला काय केव्हां ॥
वापीशीं लाविलें कुटज तरूला । देई तो छायेला काय केव्हां ॥
नैसर्गिक तेज नाहींच बीजांत । तेथें व्यर्थ यत्न कां करावा ॥ १३० ॥

REFBK-0002869
REFBK-0002869
२८६९